# एका पराभवाची गोष्ट

'आहिस्ता आहिस्ता' ही गोष्ट आहे वेश्या व्यवसायातून बाहेर पडू पाहणाऱ्या अन त्यात असफल होणाऱ्या स्त्रियांची. एका अर्थाने इतरांपेक्षा वेगळा असलेला हा चित्रपट शेवटी सध्या अस्तित्वात असलेल्या समाजव्यवस्थेचे समर्थन करुन संपतो. कशा रीतीने हे केले जाते हे पाहणे आवश्यक आहे.

सुब्बलक्ष्मीने संगीताला लहानपणीच विकत घेतलेले. मोठी झाल्यावर देवदासी बनून पैसा मिळवण्याऐवजी ती तिच्या सतार – शिक्षकाच्या प्रेमात पडली अन् त्यातून चंद्राचा जन्म झाला. चंद्राच्या जन्माआधीच चंद्रकांत – सतारशिक्षक – अचानक नाहीसा झाला. चंद्राच्या पालनपोषणासाठी संगीताने एका सधन गिऱ्हाईकाचा कायमचा स्वीकार केला व सर्वजण म्हैसूरला स्थायिक होण्यासाठी गेले. चंद्राची शेजारी राहणाऱ्या कुणालशी मैत्री झाली. व वाढत्या वयाबरोबर त्याचे रूपांतर प्रीतीत झाले. कुणालचे वडील पुरोगामी विचाराचे असल्याने त्यांचा याला पाठिंबा होता.

संगीता ज्याची रखेली होती ती व्यक्ती वारल्यानंतर सुब्बलक्ष्मीने चंद्राला देवदासी बनवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण कॉलेजच्या प्राचार्यांनी चंद्रा अभ्यासात हुशार व वक्तृत्वात बक्षीसे मिळवणारी असल्याने तिला आपली मुलगी मानून मदत करायचे ठरवले. त्यामुळे चंद्राचे शिक्षण सुरू राहिले. इकडे १८ वर्षांनंतर चंद्रकांत त्याच्या मित्राच्या घरी (कुणालचे वडील) आला व सतारीचे सूर ऐकून त्याला आपल्या पहिल्या पत्नीचा शोध लागला. परंतु त्याला स्वत.चे कुटुंब, प्रतिष्ठा याला जपायचे होते. नाते उघड न करण्याविषयी चंद्रकांतने संगीता व चंद्राकडून वचन घेतले. त्यांची दुसरी मुलगी सुधा हिचा कुणालशी विवाह करण्याची इच्छाही त्याने चंद्राला सांगितली. इकडे कुणालने चंद्राला चंद्रकांतच्या मिठीत पाहिल्याने त्याने तिला धिडकारून सुधाशी लग्न केले. वडील व प्रियकर दोघांनी नाकारल्याने चंद्राने देवदासी होण्याचा निर्णय घेतला. परंतु देवाशी विधीपूर्वक लग्न लागल्यानंतर परपुरुषाचा स्पर्श होऊ देण्याआधीच तिने पिता व प्रियकर यांच्यासमोर आत्महत्या केली. संगीतानेहि मुलीशेजारीच मरण पत्करले. चंद्रकांतने चंद्रा त्यांची मुलगी असल्याचे नंतर कबूल केले.

चित्रपटात पटकन लक्षात येणारी गोष्ट म्हणजे शरीरप्रदर्शन व हिंसाचाराचा पूर्ण अभाव वेश्याजीवनावरचाच चित्रपट असल्याने शरीरप्रदर्शनाला भरपूर वाव होता. (या संदर्भात 'इन्साफका तराजू' शी तुलना अपरिहार्य आहे.) परंतु या चलनी नाण्यांचा वापर करण्याचे दिग्दर्शकाने साफ नाकारले आहे. गाणी कुणाल, चंद्रा व संगीता तिच्याकडे सतत येणारे आप्पाजी या सर्व प्रसंगात दिग्दर्शकाने अतिशय संयम दाखविला आहे.

परंतु मूल्याच्या संदर्भात पाहिले तर सध्याच्या चित्रपटाहून हा चित्रपट फारसे निराळे काही सांगत नाही. हे लक्षात येईल. चित्रपटातील वेगवेगळ्या व्यक्ती पहा. सर्व पुरुष पात्रे ही सभ्य, पुरोगामी विचाराची आहेत. कुणालचे वडील, चंद्रकांत प्राचार्य इतकेच नव्हे तर संगीताचे गिऱ्हाईक आप्पाजी कोणातच नाव ठेवायला जागा नाही. त्याच्यातील परस्परसंबंधही अतिशय चांगले, नॉर्मल आहेत. चंद्रकांतच्या वागणुकीला तो जबाबदार नाही, तर काळ त्याला तसे वागण्यास भाग पाडतो असे दिसते. परंतु संगीता व चंद्रा सोडल्यास सर्व स्त्री–पात्रे काही ना काही वैगुण्याने युक्त दिसतात. कुणालची आई प्रतिगामी विचाराची. शेजारीण नोकरी करणारी, नवऱ्याला नोकरासारखे वागवून त्याच्यामागे लफडी करणारी व चंद्राविरुद्ध कुणालच्या आईला सतत फूस देणारी स्त्री. सुब्बलक्ष्मी व संगीता-चंद्रा यांच्यातील नाते तर उघडउघड शोषणावर

आधारलेले. सुब्बलक्ष्मी व गुंडम्मा यांची मैत्री कारस्थानांवरच आधारलेली. चित्रपटातील या विविध व्यक्ति–संबंधातून 'स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू असतात' या लोकप्रिय गैरसमाजालाच पुष्टि मिळत नाही काय?

चित्रपटातील अनेक प्रसंगाचे कारण दिग्दर्शकाने 'वक्त' या एकाच शब्दात दिले आहे. वेगवेगळया प्रसंगो होणारा 'काळ' या कल्पनेचा वापर सर्वांनाच सोयीचा ठरतो. व्यक्ति, त्यांची मूल्ये व वागणूक, समाज हे कोणीच कशालाच जबाबदार नाहीत, तर जे घडते ते काळच घडवीत असतो, हे वारंवार चित्रपटात प्रेक्षकांच्या मनावर ठसवले आहे. चंद्रकांतचे वर्तन आक्षेपार्ह ठरत नाही ते यामुळेच. आधीच दैववादीं असलेल्या भारतीय मनाला हे स्वीकारायला काहीच अडचण पडू नये.

संगीता व चंद्रा यांच्या जीवनाचा आलेख पाहिला तर पुरुषाचे प्रत्यक्ष अस्तित्व घरात नसूनही त्यांची मनोधारणा फक्त पुरुषांभोवती गुंफलेली आहे असे दिसते. पतीविना संगीताला तिची कलाहि दिलासा देऊ शकत नाही आणि पिता व प्रियकराने त्यागल्यानंतर चंद्राला तिची बुद्धिमत्ता वाचवू शकत नाही. दिग्दर्शकाला यातून काय सुचवायचे आहे? हेच की पुरुषाखेरीज स्त्रिला अस्तित्व नाही– पुरुषाचा आधार नसेल तर तिची कला, बुद्धिमत्ता सर्व व्यर्थ आहे. या दोन स्त्रियांचे जीवन आपल्याला पुन:पुन्हा ठासून सांगते की पती व पिता यांचा आधार नसेल तर स्त्रीला फक्त दोनच पर्याय शिल्लक राहतात, एक वेश्याव्यवसाय व दुसरा मृत्यू. संगीताने पहिला पर्याय स्वीकारला व चंद्राने दुसरा. मनूने हजारो वर्षापूर्वी सांगितलेला नियम अजून अस्तित्वात आहे आणि त्याचे अस्तित्व आजही समर्थनीय आहे हेच या चित्रपटाने सांगितले आहे.

आणि स्त्री–जीवनातील प्रत्येक निर्णय हा पुरुषामुळे ठरत असतो. संगीताने सुब्बलक्ष्मीचे घर न सोडण्याचे कारण ती चंद्रकांत परत येण्याची वाट पहात असते. चंद्राचा देवदासी बनण्याचा व नंतरचा मृत्युचा निर्णयहि चंद्रकांत व कुणालमुळे ठरतो. पिता व प्रियकर यांना अपमानित करण्यासाठी ती देवदासी बनते, अन अपराधाची जाणीव त्यांच्या मनात सतत रहावी म्हणून आत्महत्त्या करते. त्यांना शिक्षा करण्याच्या प्रयत्न ती स्वत:चा एक महत्वाचा अंश नाकारते, स उध्वस्त होते.

वेश्याव्यवसायाचे समर्थन या चित्रपटाने एक सा जिक गरज म्हणून केले आहे. आप्पाजीचे उद्गा "संगीतासारख्या स्त्रिया आहेत म्हणून या ज आमच्यासारख्यांना शांतता, मन रमवायला ज आहे" (आप्पाजी एका मीटिंगहून परत संगीता आल्यावरचा प्रसंग) – हेच सिद्ध करतात. चंद्रकां कुटुंब, प्रतिष्ठा टिकवायला संगीता व चंद्राला सुख त्याग करावा लागतो. जणू काही समाजाचे स्वास्थ्य सुव्यवस्था आणि कुटुंबसंस्थेचे स्थैर्य टिकविण्यास वेश्याव्यवसायाची आवश्यकता आहे! आणि यास त्याग करण्याची जबाबदारी वेश्याची आहे! म्हण संगीता व चंद्राने मरण पत्करणे भाग आहे! चि पटाच्या शेवटी 'त्याग ही सर्वश्रेष्ठ पूजा आहे. सांगून त्याचे समर्थनहि केले आहे.

देवदासीसारख्या सामाजिक विषयावरील या चि पटाचे विश्लेषण सध्याच्या देवदासींचे पुनर्वसन क ण्याच्या चळवळीच्या संदर्भातच करणे आवश्यक आ विशेष म्हणजे या चित्रपटात देवदासीना शिवण, वि काम शिकवून स्वतंत्र बनवू पाहणाऱ्या स्त्री–संघटना उल्लेख, अत्यत हास्यास्पद रीतीने का होईना, आ देवदासीना वेगवेगळया कला शिकवून, त्यांच्यासा वसतिगृहे काढून, त्यांना आर्थिक दृष्टया स्वतंत्र ब वून त्यांना वेश्याव्यवसायाच्या गर्तेतून बाहेर का ण्याच्या प्रयत्नांना या चित्रपटाने निरुपयोगी, अना वश्यक ठरवले आहे. किती प्रयत्न केले तरी जोपर्य स्त्रीला पती मिळत नाही, जोपर्यंत तिला कायदेशी वारस मानणारा पुरुष नाही, तोपर्यंत तिला या सम जात स्थान नाही हे सांगण्याखेरीज हा चित्रपट का करतो? आणि समाजाने निर्माण केलेल्या गर्तेतू बाहेर पडून स्वत:चे स्वतंत्र मानाचे स्थान निर्माण क पाहणाऱ्या असंख्य स्त्रियांना या चित्रपटाने कोण दिलासा दिला– याचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागेल

उर्मिला जो
४०१४, भोंडे कॉलनी, एरंडवणा, पुणे

संपादक, मुद्रक, प्रकाशक. मालक : सौदामिनी राव ☆ प्रकाशन स्थळ व कार्यालय : १७ प्रभात रस्ता, पुणे
मुद्रण स्थळ : मानोबा मुद्रण, १२५९/२ जंगली महाराज रस्ता, पुणे ४